दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १४१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६
आज विजया एकादशी आहे
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, शिशिर ऋतु, माघ मास, कृष्णपक्ष, एकादशी दुपारी २-२६ पर्यंत. दिवस नक्षत्र– मूळ संध्याकाळी ४-१३ पर्यंत नंतर पूर्वाषाढा, योग– वज्र रात्री ३-२३ पर्यंत नंतर सिद्धि.
आज चांगला दिवस आहे

### अनधिकृत होर्डिंगविरोधात कारवाई

**पुणे** : शहरातील शहरातील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्यासाठी महापालिकेने पाच विशेष पथकांची नियुक्ती केली असून, या पथकांमार्फत शहरभर तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. परवानगीशिवाय लावलेले होर्डिंग, नियमांचे उल्लंघन करणारे, तसेच दिलेल्या आकारमानापेक्षा मोठ्या मापाचे फलक यांच्यावर कारवाई करून ते निष्कासीत केले जाणार असल्याची माहिती महापालिकेच्या आकाशचिन्ह विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी दिली.

## सारांश वृत्त

### देशव्यापी संपाचा परिणाम नाही

**नवी दिल्ली** : "केंद्र सरकारच्या कामगारविरोधी, शेतकरीविरोधी आणि देशविरोधी कॉर्पोरेट-केंद्रित धोरणांच्या" कथित निषेधार्थ गुरुवारी देशभरातील केंद्रीय कामगार संघटनांच्या संयुक्त मंचाने दिलेल्या संपाच्या आवाहनाचा सामान्य जीवनावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला नाही. अहवालांनुसार, ओडिशा, केरळ, तामिळनाडू, गोवा, झारखंड, छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि पंजाब या राज्यांमध्ये संमिश्र प्रतिसाद दिसून आला. वृत्तानुसार, १२ तासांच्या देशव्यापी आंदोलनामुळे ओडिशात सामान्य जनजीवन विस्कळीत झाले.

### अतिक्रमणांविरोधात धडक कारवाई

**जम्मू** : ऑक्टोबर २०२४ मध्ये नॅशनल कॉन्फरन्सच्या नेतृत्वाखालील सरकार स्थापन झाल्यापासून जम्मू आणि काश्मीरमध्ये निवासी इमारतींसह एकूण १,४२५ बेकायदेशीर बांधकामे पाडण्यात आली आहेत, अशी माहिती गुरुवारी विधानसभेत देण्यात आली. पाडण्यात आलेल्या मालमत्तांमध्ये जम्मूमधील पत्रकार अरफाज अहमद दैंग यांचे घर समाविष्ट होते, सरकारने म्हटले आहे की कारवाईपूर्वी जेके सार्वजनिक परिसर कायदा, १९८८ आणि संबंधित कायद्यांनुसार योग्य प्रक्रिया पाळण्यात आली होती.

### पुद्दुचेरी राज्याच्या मागणीचा पुनरुच्चार

**पुदुच्चेरी** : १९६२ मध्ये माजी फ्रेंच संस्थांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण झाल्यापासून पुदुच्चेरी हा केंद्रशासित प्रदेश आहे, त्याला राज्याचा दर्जा देण्याची मागणी मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांनी गुरुवारी पुन्हा एकदा मांडली. राज्याच्या दर्जाची मागणी थांबू न देता दाबली पाहिजे, या विरोधी पक्ष द्रमुक सदस्य आर शिवा आणि एएमएच नझीम यांनी व्यक्त केलेल्या मतांना ते उत्तर देत होते.

### सन २०२६-२७ साठी १,०३२.८८ कोटींचा प्रारूप आराखडा मंजूर

# सुनेत्राताईंचा दादा स्टाईल धडाका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विधानभवन येथे आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार होत्या. सुनेत्राताईंनी अजित दादा यांच्याप्रमाणेच कामाचा धडाका कायम ठेवल्याचे दिसून आले.

या बैठकीत पुणे जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ साठी शासनाने प्रस्तावित केलेल्या १,०३२.८८ कोटी रुपयांच्या वित्तीय मर्यादेच्या प्रारूप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीने मान्यता दिली. ग्रामीण विकास, परिवहन, अपारंपरिक ऊर्जा, हरित महाराष्ट्र, नागरी पायाभूत सुविधा, आरोग्य, महिला व बालकांचे सशक्तीकरण, कौशल्यपूर्ण रोजगारनिर्मिती, शिक्षण, क्रीडा व कलागुणांचा विकास या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिली. विधानभवन येथील झुंबर हॉलमध्ये झालेल्या बैठकीत सुनेत्रा पवार यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. पुणे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, प्रस्तावित आराखड्यात ग्रामीण विकासासाठी १३५ कोटी, परिवहन विकासासाठी ११५ कोटी, नागरी पायाभूत सुविधांसाठी ११६.२५ कोटी, अपारंपरिक ऊर्जा व ऊर्जा विकासासाठी ८० कोटी, पर्यटन विकासासाठी ५६.८६ कोटी, हरित महाराष्ट्रासाठी ४० कोटी, आरोग्य पायाभूत सुविधांसाठी ११०.७१ कोटी, महिला व बालक सशक्तीकरणासाठी २९.४४ कोटी, गतिमान प्रशासनासाठी ७८.५० कोटी, कौशल्यपूर्ण रोजगारनिर्मितीसाठी १०.५० कोटी, शैक्षणिक पायाभूत सुविधांसाठी १०० कोटी तसेच क्रीडा व कलागुणांच्या विकासासाठी १०.१० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

शासनाने १,०३२.८८ कोटी रुपयांची वित्तीय मर्यादा निश्चित केली असली तरी विविध विभागांकडून एकूण ३,१२८ कोटी रुपयांच्या मागण्या प्राप्त झाल्या आहेत. या मागण्यांची छाननी करून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक व प्राधान्यक्रमातील प्रकल्पांचा समावेश करण्यात येत असून, ७०० कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी शासनाकडे करण्यात येणार आहे. सर्व कामांसाठी प्रशासकीय मान्यता, निविदा प्रक्रिया व अंमलबजावणीसाठी ठराविक कालमर्यादा निश्चित करून त्याचे काटेकोर पालन करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले.

सन २०२५-२६ साठी मंजूर १,३६९ कोटी रुपयांच्या सर्वसाधारण योजनेसह एकूण १,५८९ कोटी ४६ लाख रुपयांच्या नियतव्ययाचा आढावा बैठकीत घेण्यात आला. निधी वेळेत व नियोजनबद्ध खर्च होईल याची दक्षता घ्यावी, तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घालून दिलेल्या शिस्त, गुणवत्ता व कालमर्यादेच्या तत्त्वांनुसार प्रकल्प पूर्ण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे, असे सुनेत्रा पवार यांनी नमूद केले. येत्या एप्रिल महिन्यात प्रत्यक्ष उपस्थितीत सविस्तर आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## ऊसतोड कामगारांसाठी दोन दिवसात दुसरी गुड न्यूज!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेतून बीड जिल्ह्यातील ११ वसतिगृहांना १५९ कोटींचा निधी उपलब्ध करून दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ऊसतोड कामगारांसाठी आणखी एक आनंदाची बातमी आहे. शासनाने ४ लाख ऊसतोड कामगारांना सण उत्सव उत्साहात साजरे करण्यात यावेत, यासाठी खास मोफत शिधासंच वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे.

पहिल्या टप्प्यात या योजनेतून ४ लाख नोंदणीकृत ऊसतोड कामगारांपैकी १ लाख कामगारांना हा शिधासंच मोफत दिला जाणार असून उर्वरित ३ लाख कामगारांना टप्प्या टप्प्याने हा शिधा दिला जाणार आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात धनंजय मुंडे हे सामाजिक न्याय विभागाचे मंत्री असताना लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाला मूर्त स्वरूप प्राप्त होऊन कायमस्वरूपी निधीची तरतूद करण्यात आली होती. ऊसतोड कामगारांना सण उत्सव साजरे करता यावेत, यासाठी आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय तत्कालीन मंत्री त्यांनी घेतला होता.

दरम्यान या शिधासंचामध्ये २ किलो साखर, एक किलो खाद्यतेल, एक किलो चणा डाळ, एक किलो रवा, एक किलो मैदा, एक किलो पोहे अशी सुमारे ६१० रुपये किंमतीच्या खाद्य पदार्थांचा समावेश असणार आहे.

## पार्थ पवारांचा राज्यसभेचा मार्ग मोकळा
### मोदी-सुनेत्रा पवार भेटीनंतर संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाच्या घडामोडींना वेग आला असून पार्थ पवार यांचा राज्यसभेतील प्रवेश जवळपास निश्चित मानला जात आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बुधवारी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर या चर्चांना अधिक बळ मिळाले आहे. या भेटीत दोघांमध्ये सुमारे चाळीस मिनिटे सविस्तर चर्चा झाली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी दिवंगत अजित पवार यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांच्या योगदानाबद्दल आदर व्यक्त केला. तसेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा घटक पक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसला भाजपकडून पूर्ण पाठिंबा राहील, असे आश्वासन देण्यात आले.

पंतप्रधानांशी भेटीनंतर सुनेत्रा पवार यांनी गृहमंत्री अमित शाह यांचीही भेट घेतली. या बैठकीत पार्थ पवार यांच्या राजकीय भूमिकेबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचे समजते. भाजप नेतृत्वाने पार्थ पवार यांना राज्यसभेवर पाठवण्याच्या प्रस्तावाला अनुकूलता दर्शवली असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. सुनेत्रा पवार यांच्या राज्यसभा सदस्यत्वाच्या जागेवर पार्थ पवार यांची निवड केली जाईल, अशी रणनीती आखली जात असल्याचेही सांगण्यात येते.


दरम्यान, राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे संभाव्य विलीनीकरण होईल, अशा चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होत्या. मात्र दिल्लीतील या महत्त्वाच्या बैठकीनंतर त्या चर्चांना पूर्णविराम मिळाल्याचे चित्र आहे.

### किशोरवयीन मुलांना सोशल मीडियाचे व्यसन

# इन्स्टाग्राम-यूट्यूबविरोधात खटला सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : सोशल मीडिया हे केवळ संवादाचे माध्यम राहिलेले नाही; तर ते आज किशोरवयीन मुलांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहे. मात्र, या डिजिटल सवयींची किंमत मानसिक आरोग्याच्या रूपाने मोजावी लागते का, हा प्रश्न आता थेट न्यायालयात पोहोचला आहे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया न्यायालयात सुरू झालेला इन्स्टाग्राम आणि यूट्यूबविरोधातील खटला केवळ एका तरुणीचा वैयक्तिक संघर्ष नाही, तर संपूर्ण सोशल मीडिया उद्योगाच्या नैतिक जबाबदारीवर प्रकाश टाकणारा आणि त्याचवेळेस त्या संदर्भात महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करणारा ठरला आहे.




जगभरातील सोशल मीडियाच्या किशोरवयीन मुलांच्या मानसिक आरोग्यावर होणा-या परिणामांबाबत गंभीर चर्चा सुरू असतानाच या खटल्याच्या सुनावणीस सुरुवात होत आहे, हे विशेष. चिंता, नैराश्य आणि शरीराविषयी न्यूनगंड, त्याचबरोबर दुसरीकडे मनात आत्महत्येचे विचार आदी सर्व बाबींशी सोशल मीडियाच्या वापराचा अतिशय निकटचा संबंध असल्याचे अनेक संशोधनांतून आणि अभ्यासांमधून समोर आले आहे. इन्स्टाग्राम आणि यूट्यूबने जाणीवपूर्वक अशा डिझाइन वैशिष्ट्यांचा वापर खुबीने केला आहे, जे मानवी मेंदूतील 'रिवॉर्ड सिस्टीम' सक्रिय करतात. यामध्ये अखंड स्क्रोलिंग, ऑटोप्ले व्हीडीओ, सतत बदलणारे अल्गोरिदम, 'लाईक्स' आणि नोटिफिकेशन्स यांचा समावेश आहे. हे सगळे घटक वापरकर्त्याला ॲपवर जास्त वेळ घालवण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहेत, असा याचिकाकर्त्यांचा आरोप आहे.फिर्यादी पक्षाचे वकील मार्क लॅनिअर यांनी न्यायालयासमोर युक्तिवाद करताना सांगितले की, 'प्रत्येक स्वाइप म्हणजे स्लॉट मशीनचे हँडल ओढण्यासारखेच आहे. पुढे काय दिसेल, हे माहीत नसते, पण तरीही मेंदूला मिळणारे उत्तेजन निश्चित असते. मानसशास्त्रज्ञांच्या मते, अशा 'व्हेरिएबल रिवॉर्ड' प्रणालीमुळे डोपामिनचे स्राव वाढतात आणि व्यसनसदृश वर्तन तयार होते. फिर्यादीचा दावा आहे की याच प्रक्रियेमुळे केजीएमला तीव्र चिंता, शरीराबाबत न्यूनगंड निर्माण होऊन मनात आत्महत्येचे विचार येऊ लागले.

या प्रकरणातील फिर्यादी ही २० वर्षीय तरुणी असून तिने न्यायालयीन गोपनीयतेसाठी स्वतःची ओळख 'केजीएम' अशी ठेवली आहे. तिने सहाव्या वर्षी यूट्यूब वापरण्यास सुरुवात केली आणि नवव्या वर्षी इन्स्टाग्रामवर अकाउंट उघडले. त्यानंतर हळूहळू या प्लॅटफॉर्म्सनी तिचे आयुष्यच नियंत्रण करण्यास सुरुवात केली असा तिचा आणि तिच्या आईचा दावा आहे.

दरम्यान, रशियामध्ये समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर निर्बंध लादण्यात आले असून राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या सरकारने व्हॉट्सॲप, युट्यूब, इन्स्टाग्रामसह अनेक परदेशी समाजमाध्यम मंचांवर बंदी घातली आहे. या निर्णयामुळे देशातील सुमारे दहा कोटी वापरकर्त्यांवर परिणाम झाला आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की, नागरिकांचा वैयक्तिक डेटा सुरक्षित ठेवणे, गोपनीयतेचे संरक्षण करणे आणि संभाव्य गैरवापर रोखणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. परदेशी कंपन्यांच्या माध्यमातून नागरिकांचा डेटा बाहेर गळती होण्याचा धोका असल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला आहे.

## ११४ राफेल विमानांच्या खरेदीला मंजुरी
### देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला मोठी चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : संरक्षण अधिग्रहण परिषदेने गुरुवारी फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या महत्त्वाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. स्वदेशी संरक्षण उत्पादनाला यामुळे चालना मिळणार आहे.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत संरक्षण अधिग्रहण परिषदेने सुमारे ३ लाख ६० हजार कोटी रुपयांच्या लष्करी उपकरणांच्या भांडवली खरेदीस मान्यता दिली. यामध्ये राफेल लढाऊ विमानांचा हा प्रमुख प्रस्ताव



समाविष्ट आहे. या निर्णयाचा उद्देश संरक्षण दलांची लढाऊ तयारी आणि कार्यक्षमता वाढवणे हा आहे. या ११४ विमानांपैकी सुमारे ९० विमाने देशातच तयार केली जाणार असून त्यामध्ये सुमारे ५० टक्के स्वदेशी घटकांचा वापर केला जाणार आहे. उर्वरित विमाने भारतीय हवाई दलाच्या तातडीच्या गरजा लक्षात घेऊन थेट उड्डाणास तयार अवस्थेत खरेदी केली जाण्याची शक्यता आहे.

भारतीय हवाई दलाच्या लढाऊ विमानांच्या तुकड्यांची संख्या सतत घटत असल्याने ही मंजुरी महत्त्वाची मानली जात आहे. जुन्या विमानांची निवृत्ती आणि नवीन विमानांच्या समावेशातील विलंब यामुळे ही संख्या मंजूर मर्यादेपेक्षा खूपच खाली आली आहे. अशा परिस्थितीत राफेल विमानांचा मोठ्या प्रमाणावर समावेश केल्यास क्षमतेतील तफावत भरून निघण्यास मदत होईल, असे संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या होणाऱ्या भारत भेटीच्या पार्श्वभूमीवर ही मंजुरी देण्यात आल्याने भारत-फ्रान्स संरक्षण सहकार्य अधिक दृढ होत असल्याचे संकेत मिळतात. देशात मोठ्या प्रमाणावर लढाऊ विमाने तयार झाल्यास भारतीय हवाई आणि अंतराळ क्षेत्रातील उद्योगांना मोठी संधी मिळणार आहे. या योजनेत भारतीय कंपन्यांचा व्यापक सहभाग, फ्रेंच उत्पादकाकडून तंत्रज्ञान हस्तांतरण आणि स्थानिक पुरवठा साखळी उभारणीचा समावेश आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करून स्वयंपूर्ण संरक्षण औद्योगिक पाया निर्माण करण्याच्या सरकारच्या धोरणाशी हा निर्णय सुसंगत आहे.

### एमआयटी सांस्कृतिक महोत्सवात तोडफोड

**पुणे** : एमआयटी वर्ल्ड पीस विद्यापीठात आयोजित जागतिक सांस्कृतिक महोत्सवाच्या दरम्यान मंगळवारी संध्याकाळी तोडफोडीची घटना घडल्याने खळबळ उडाली. वार्षिक कार्यक्रम सुरू असताना काही अनधिकृत व्यक्तींनी कॅम्पसमध्ये प्रवेश करून बांगलादेशचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलची तोडफोड केल्याचा आरोप आहे. कार्यक्रमस्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. भारतीयांसह परदेशी विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. काही व्यक्ती अचानक कॅम्पसमध्ये घुसल्या आणि बांगलादेशशी संबंधित स्टॉलवर हल्ला केला.

## विजय मल्ल्याला अखेरची संधी
### अन्यथा याचिका ऐकणार नाही – मुंबई उच्च न्यायालय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : फरार आर्थिक गुन्हेगार विजय मल्ल्याला भारतात परतण्यासाठी अखेरची संधी देत मुंबई उच्च न्यायालयाने कडक शब्दांत कानउघडणी केली आहे. भारतात परत येण्याबाबत स्पष्ट भूमिका न घेतल्यास फ्युजिटिव्ह इकॉनॉमिक ऑफेंडर कायद्याला आव्हान देणारी त्याची याचिका ऐकली जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

"तुम्हाला भारतात परत यावंच लागेल. तुम्ही न्यायालयीन प्रक्रियेपासून दूर पळत असाल, तर या कार्यवाहीचा लाभ घेता येणार नाही," असे ठणकावून सांगत न्यायालयाने मल्ल्याला शेवटची संधी दिली आहे. मात्र न्यायनिष्ठा राखत, याचिका तत्काळ फेटाळून न लावता पुढील सुनावणी १८ फेब्रुवारीला ठेवण्यात आली आहे. विजय मल्ल्याने एफईओ कायद्यातील तरतुदींच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले असून, जानेवारी २०१९ मध्ये विशेष न्यायालयाने दिलेल्या 'फरार आर्थिक गुन्हेगार' घोषित करण्याच्या आदेशालाही उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या याचिकांवर मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर गुरुवारी सुनावणी झाली. न्यायालयाने नमूद केले की, २३ डिसेंबर रोजी झालेल्या सुनावणीत भारतात केव्हा परतणार याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, अद्याप मल्ल्याने त्याबाबतचे कंप्लायंस प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाही.

दरम्यान, तपास यंत्रणांच्या वतीने मांडण्यात आलेल्या युक्तिवादानुसार, मल्ल्याच्या प्रतिज्ञापत्रातील अनेक दावे वस्तुस्थितीला धरून नाहीत. बँकांकडून पैसे मागणे चुकीचे असल्याचा तसेच आपल्याविरोधातील कारवाई केवळ वसुलीसाठी असल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे तपास यंत्रणांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले. यावेळी न्यायालयाने स्पष्ट केले की, ही याचिका पुढे चालवायची असल्यास मल्ल्याला भारतात परत यावेच लागेल.

### व्हॅलेंटाइन डेच्या निमित्ताने मागणीत झाली वाढ

# मावळमधून सातासमुद्रापार सत्तर लाख गुलाबांची निर्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : प्रेमाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या लाल गुलाबांना व्हॅलेंटाइन दिनाच्या पार्श्वभूमीवर मोठी मागणी वाढली असून पुणे जिल्ह्यातील मावळ तालुका या मागणीचा केंद्रबिंदू ठरला आहे. यंदा मावळातून सुमारे साठ ते सत्तर लाख गुलाबांची परदेशात निर्यात होत असून, देशांतर्गत बाजारातही नव्वद लाखांहून अधिक गुलाब पाठवले जात आहेत. त्यामुळे फुल उत्पादक शेतकरी आणि निर्यातदारांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

मावळ तालुका हा राज्यातील प्रमुख फुलउत्पादन क्षेत्र म्हणून ओळखला जातो.



येथे आधुनिक शेती पद्धतींचा, विशेषतः पॉलीहाऊस तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. यंदा नोव्हेंबरपासून पडलेल्या थंडीमुळे गुलाबांच्या उत्पादनावर सकारात्मक परिणाम झाला. थंड हवामानामुळे फुलांचा रंग अधिक गडद, देठ मजबूत आणि कळीची गुणवत्ता उत्तम मिळाल्याने बाजारात या गुलाबांना चांगला दर मिळत आहे. एका गुलाबाला साधारण वीस ते पंचवीस रुपये दर मिळत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. हॉलंड, ब्रिटन, दुबई, सिंगापूर, जपान तसेच गल्फ देश, युरोप, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड येथून मावळातील गुलाबांना मोठी मागणी आहे. फुल उत्पादक शेतकरी दिलीप काळे यांनी सांगितले की, यंदा गुणवत्तेमुळे परदेशी खरेदीदारांकडून मागणी वाढली असून निर्यातीचे प्रमाण लक्षणीय आहे.

गुलाब काढल्यानंतर तात्काळ त्यांचे वर्गीकरण केले जाते. कळीचा आकार, देठाची लांबी, रंग आणि ताजेपणा यानुसार फुलांची निवड होते. त्यानंतर गुलाबांना थंड पाण्यात प्री-कूलिंग करून तापमान कमी केले जाते. खास हवेशीर खोके वापरून पॅकिंग करून हे गुलाब कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवले जातात आणि विमानमार्गे परदेशात पाठवले जातात. संपूर्ण प्रक्रियेत तापमान दोन ते पाच अंशांदरम्यान राखले जाते.

योग्य काढणी, कोल्ड चेन आणि पॅकिंगमुळे गुलाबांची टिकाऊपणा साधारण दहा ते पंधरा दिवस राहतो, तर उच्च दर्जाच्या गुलाबांची टिकाऊपणा वीस दिवसांपर्यंत असू शकतो. त्यामुळे परदेशी बाजारात पोहोचेपर्यंत फुले ताजी आणि आकर्षक राहतात. व्हॅलेंटाइन दिनामुळे वाढलेल्या मागणीमुळे मावळातील गुलाब शेतकऱ्यांसाठी केवळ प्रेमाचे प्रतीक न राहता आर्थिक दिलास्याचे आणि ग्रामीण भागातील रोजगारनिर्मितीचे महत्त्वाचे साधन ठरत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान आणि नियोजनबद्ध निर्यातीच्या जोरावर मावळातील गुलाबांनी जागतिक बाजारात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

## 'घुसखोर पंडित' शीर्षकावर सर्वोच्च न्यायालयाची नाराजी


■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : 'घुसखोर पंडित' या चित्रपटाच्या शीर्षकावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी चित्रपटाच्या निर्मात्यांना कडक शब्दांत फटकारले. अशा प्रकारचे शीर्षक समाजातील एका घटकाची बदनामी करणारे ठरू शकते आणि ते नैतिकता तसेच सार्वजनिक सुव्यवस्थेच्या विरोधात आहे, असे स्पष्ट मत न्यायालयाने व्यक्त केले.

मनोज वाजपेयी अभिनीत या चित्रपटाचे जाळ्यावर प्रसारण होऊ नये, यासाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली. या चित्रपटामुळे जात आणि धर्माधारित रूढी बळावतात, तसेच सार्वजनिक सुव्यवस्था, सांप्रदायिक सलोखा आणि घटनात्मक मूल्यांना धोका निर्माण होतो, असा याचिकाकर्त्यांचा दावा आहे. ब्राह्मण समाजाच्या राष्ट्रीय संघटनेचे सचिव अतुल मिश्रा यांनी ही याचिका दाखल केली आहे. याचिकेत चित्रपटाचे शीर्षक आणि कथा प्रथमदर्शनी आक्षेपार्ह आणि अपमानास्पद असल्याचे नमूद करण्यात आले आहे. 'पंडित' हा शब्द जात आणि धार्मिक ओळख दर्शवणारा असून त्याला 'घुसखोर' असा शब्द जोडल्याने संपूर्ण समुदायाची बदनामी होते, असा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सुनावणी करताना न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने माहिती व प्रसारण मंत्रालय, केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ आणि चित्रपटाचे निर्माते नीरज पांडे यांना नोटीस बजावली.

# संपादकीय

## संसदेचा आवाज की सत्तेचा आवेग?



**लोकसभेत भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी राहुल गांधींच्या सदस्यत्वाबाबत उपस्थित केलेला मुद्दा हा व्यक्तीविरोधी राजकारणापुरता मर्यादित नाही. तो संसदीय परंपरा, विरोधकांचे स्थान आणि लोकशाहीतील असहमतीची सहनशीलता यांवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारा आहे.**

भारतीय संसदेचा इतिहास हा संघर्ष, मतभिन्नता आणि त्यातून तयार झालेल्या सहमतीचा आहे. विरोधकांचे प्रश्न, सरकारवर टीका, सत्ताधाऱ्यांची कोंडी हे सारे लोकशाहीचे अपरिहार्य अवयव. मात्र अलीकडच्या काळात संसदेत जे घडते आहे, ते या परंपरेला छेद देणारे ठरत आहे. राहुल गांधींच्या संसदीय भूमिकेवरून त्यांच्या सदस्यत्वावरच प्रश्नचिन्ह उभे करण्याचा प्रयत्न हा त्याचाच एक भाग. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेत राहुल गांधींच्या वर्तनाबाबत गंभीर आक्षेप घेत सदस्यत्वाबाबत कारवाईची मागणी केली. राजकीय मतभेद असणे स्वाभाविक आहे; पण ते संसदीय चौकटीत हाताळले जाणे हीच लोकशाहीची कसोटी असते. विरोधकाच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त करणे आणि त्याला संसदेतून हद्दपार करण्याची भाषा करणे, या दोन गोष्टींमध्ये मूलभूत फरक आहे. संसद ही केवळ बहुमताचे व्यासपीठ नाही; ती अल्पमताच्या आवाजासाठीही तितकीच महत्त्वाची आहे. विरोधकांना बोलू दिले नाही, तर संसद केवळ औपचारिक मंजुरी देणारी यंत्रणा ठरेल. राहुल गांधी हे विरोधी पक्षाचे प्रमुख नेते आहेत. त्यांच्या विधानांवर टीका होऊ शकते, त्यावर प्रत्युत्तर दिले जाऊ शकते; पण त्यांच्या उपस्थितीवरच आक्षेप घेणे म्हणजे संसदीय लोकशाहीच्या मुळावर घाव घालणे होय. सत्ताधाऱ्यांकडे बहुमत असते, अधिकार असतात, नियमांची अंमलबजावणी करण्याची शक्ती असते. पण त्याचबरोबर संयमाची जबाबदारीही त्यांचीच असते. विरोधक चिथावणीखोर बोलले, आक्षेपार्ह विधान केले, तर त्यासाठी नियमांमध्ये शिक्षा आहेत. नाव काढून घेणे, शब्द कामकाजातून वगळणे, निलंबन. मात्र सदस्यत्व रद्द करण्याच्या मागण्या या अपवादात्मक आणि अत्यंत गंभीर बाबी आहेत. लोकसभेत याआधीही अनेकदा तीव्र भाषा वापरली गेली आहे. सत्ताधारी आणि विरोधक, दोघांनीही कधी ना कधी मर्यादा ओलांडल्या आहेत. पण त्या प्रत्येक वेळी संसदेतून हद्दपारी हा उपाय स्वीकारला गेला असता, तर आजची संसद रिकामीच दिसली असती. म्हणूनच परंपरा, संकेत आणि अलिखित नियम यांचे महत्त्व संसदीय लोकशाहीत मोठे आहे. निशिकांत दुबे यांचा आक्रमक पवित्रा हा केवळ एका खासदाराचा व्यक्तिगत आवेश म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. तो सध्याच्या राजकीय संस्कृतीचे द्योतक आहे. विरोधकाला उत्तर देण्याऐवजी त्याला अडवणे, प्रश्नांची चिकित्सा करण्याऐवजी प्रश्नकर्त्यावरच आरोप करणे, आणि चर्चेऐवजी कारवाईचा आग्रह धरणे ही प्रवृत्ती धोक्याची आहे. लोकशाहीत असहमती ही कमजोरी नसून ताकद असते. विरोधी मतांमुळेच धोरणे तपासली जातात, चुका उघड होतात आणि सत्ताधाऱ्यांना आत्मपरीक्षणाची संधी मिळते. संसदेत विरोधक नकोसे वाटू लागले, की सत्ता स्वतःच्या सावलीपासूनही घाबरू लागते, असे मानले जाते. या वादाचा आणखी एक पैलू म्हणजे संसदेला बाहेरून पाहणाऱ्या नागरिकांचा विश्वास. सामान्य नागरिकासाठी संसद ही अंतिम निर्णय घेणारी संस्था आहे. तेथे वाद होतात, पण ते विवेकाच्या चौकटीत होतील, अशी अपेक्षा असते. परंतु जेव्हा सदस्यत्व रद्द करण्यासारख्या मागण्या सहजपणे केल्या जातात, तेव्हा संसदेच्या गांभीर्यावरच प्रश्नचिन्ह उभे राहते. राहुल गांधी हे राजकीयदृष्ट्या वादग्रस्त व्यक्तिमत्त्व आहे, हे नाकारता येणार नाही. त्यांची विधाने, त्यांची शैली, त्यांचे राजकारण यावर टीका होऊ शकते आणि ती होणारच. पण त्या टीकेला उत्तर देण्याचे व्यासपीठ संसदेतच आहे. तेथेच युक्तिवादाने, तथ्यांनी आणि राजकीय परिपक्वतेने सामना करणे अपेक्षित आहे. आज प्रश्न राहुल गांधींचा नाही; उद्या तो कोणत्याही विरोधकाचा असू शकतो. आज जे पेरले जाते, तेच उद्या उगवते, हा राजकारणाचा इतिहास आहे. म्हणूनच सत्ताधाऱ्यांनी तात्कालिक राजकीय फायद्याऐवजी दीर्घकालीन लोकशाही मूल्यांचा विचार करणे गरजेचे आहे. संसद हे रणांगण नाही; ती संवादाची जागा आहे. तेथे संघर्ष असतो, पण तो शब्दांचा असतो, विचारांचा असतो. व्यक्तींच्या अस्तित्वावरच आघात करण्याची पद्धत स्वीकारली, तर संसदीय लोकशाहीचे स्वरूपच बदलून जाईल. शेवटी एवढेच म्हणावे लागेल की, बहुमताच्या बळावर विरोधकांना गप्प करणे सोपे असते; पण विरोधकांसह चालत लोकशाही टिकवणे हेच खरे राजकीय कसब आहे. संसदेला आवाज हवा आहे. तो कोणाचाही असो आणि त्या आवाजाचे रक्षण करणे हीच तिची प्रतिष्ठा आहे.
-

# संरक्षण आणि आकर्षण यांच्यात अडकलेले धोरण!

**» परकीय गुंतवणूक आकर्षित करायची आणि देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करायचे, या दोन टोकांमध्ये भारताचे आर्थिक धोरण अनेक वर्षे हेलकावत राहिले आहे. सद्यस्थितीत हा तोल अधिकच ढासळत असून, धोरणातील विसंगती अर्थव्यवस्थेसमोर नवे प्रश्न उभे करत आहेत.**



भारताची आर्थिक वाटचाल समजून घ्यायची असेल, तर परकीय गुंतवणूक आणि संरक्षणवाद यांच्यातील संघर्ष नीट उलगडावा लागतो. १९९१ नंतर खुलेपणाचा स्वीकार करताना भारताने जागतिक भांडवलासाठी दरवाजे उघडले, पण ते करत असताना "आपले काय?" हा प्रश्न कायम दुर्लक्षित राहिला. आजही हीच दुविधा धोरणांच्या प्रत्येक पानावर दिसून येते. परकीय गुंतवणूक म्हणजे केवळ पैसा नव्हे. ती तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्य, जागतिक बाजाराशी जोड आणि स्पर्धेची नवी शिस्त घेऊन येते. तरीही भारतात अनेकदा परकीय गुंतवणुकीकडे संशयाने पाहिले जाते. ती आल्याने देशांतर्गत उद्योग उद्ध्वस्त होतील, लघुउद्योग संपतील, रोजगार धोक्यात येतील, अशी भीती वारंवार व्यक्त केली जाते. या भीतीतूनच संरक्षणवादी नियमांची निर्मिती होते. पण प्रश्न असा आहे की, हे संरक्षण खरेच कुणाचे होते? किरकोळ व्यापार, डिजिटल बाजारपेठ, ई-कॉमर्स किंवा नव्या तंत्रज्ञानाशी संबंधित क्षेत्रे पाहिली, तर लक्षात येते की परकीय कंपन्यांवर निर्बंध घालताना प्रत्यक्षात मोठ्या देशांतर्गत कॉर्पोरेट समूहांना मोकळे रान मिळाले. लघुउद्योग, छोटे दुकानदार किंवा नवउद्योजक यांचे संरक्षण झाले, असा दावा वास्तवाशी फारसा जुळत नाही. उलट, भांडवल, तंत्रज्ञान आणि बाजारपेठेवर मक्तेदारी निर्माण होण्याचा धोका वाढला. ही परिस्थिती धोरणात्मक विसंगतीची देण आहे. सरकार एकीकडे 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत'ची भाषा करते, तर दुसरीकडे स्थानिक उद्योगांना सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेली पायाभूत रचना, कर्जसुलभता, कौशल्यविकास आणि नियामक स्थैर्य पुरेशा प्रमाणात देऊ शकलेली नाही. परिणामी, संरक्षणाची भिंत उभी राहते, पण तिच्या आत उद्योग वाढण्याऐवजी कुजतात. परकीय गुंतवणुकीबाबत भारताची भूमिका अनेकदा प्रतिक्रियात्मक राहिली आहे. जागतिक परिस्थिती बदलली, तणाव वाढले, किंवा एखाद्या देशाशी संबंध ताणले गेले, की धोरणेही बदलली. दीर्घकालीन दृष्टीचा अभाव ही भारताची मोठी मर्यादा ठरली आहे. गुंतवणूकदारांना केवळ सवलती नको असतात; त्यांना स्थैर्य, स्पष्टता आणि विश्वास हवा असतो. नियम वारंवार बदलले, तर भांडवल येणारच नाही, हे साधे अर्थशास्त्र आहे. याच पार्श्वभूमीवर संरक्षणवादाचे समर्थन केले जाते. "आपण स्वतः सक्षम होईपर्यंत बाहेरच्यांना रोखा," हा युक्तिवाद ऐकायला आकर्षक वाटतो. पण हा 'पर्यंत'चा कालावधी नेमका किती? तीन वर्षे, दहा वर्षे, की कायमचा? संरक्षणाची सवय लागली, की स्पर्धा स्वीकारण्याची क्षमता बोथट होते. भारतीय उद्योगांनी जागतिक दर्जा गाठावा, अशी अपेक्षा असेल, तर त्यांना स्पर्धेपासून दूर ठेवून ते साध्य होणार नाही. डिजिटल आणि तंत्रज्ञान क्षेत्रात ही विसंगती अधिक तीव्रपणे जाणवते. परकीय प्लॅटफॉर्म्सवर निर्बंध घालून देशांतर्गत स्टार्टअप्सना संधी देण्याचा दावा केला जातो. पण प्रत्यक्षात त्या स्टार्टअप्सना भांडवल, संशोधनासाठी निधी, जागतिक बाजारपेठेतील प्रवेश आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यांची गरज असते. परकीय गुंतवणूक रोखली, की या संधीही मर्यादित होतात. खरा प्रश्न संरक्षण विरुद्ध आकर्षण असा नाही; तो दोन्हींच्या योग्य समतोलाचा आहे. कोणत्या क्षेत्रात संरक्षण आवश्यक आहे आणि कोणत्या क्षेत्रात खुली स्पर्धा फायदेशीर ठरेल, याचे स्पष्ट वर्गीकरण धोरणांत दिसत नाही. सर्वच क्षेत्रांसाठी एकच साचा वापरला जातो. परिणामी, ना परकीय गुंतवणूक मनापासून येते, ना देशांतर्गत उद्योग आत्मविश्वासाने उभे राहतात. यात उपभोक्त्याचा विचार सर्वात शेवटी केला जातो. स्पर्धा कमी झाली, की किंमती वाढतात, गुणवत्ता घसरते आणि पर्याय मर्यादित होतात. संरक्षणाच्या नावाखाली उपभोक्त्याचे नुकसान होत असेल, तर अशा धोरणांचे समर्थन करणे कठीण आहे. आर्थिक धोरणाचा अंतिम उद्देश उद्योग नव्हे, तर नागरिकांचे कल्याण असायला हवे. भारताला आज गरज आहे ती स्पष्ट, सुसंगत आणि दीर्घकालीन परकीय गुंतवणूक धोरणाची. जेथे संरक्षण आवश्यक आहे, तेथे ते कालमर्यादित आणि उद्दिष्टाधारित असावे. आणि जेथे आकर्षण आवश्यक आहे, तेथे अनावश्यक निर्बंध, संशय आणि धोरणात्मक संभ्रम दूर करावा लागेल. आत्मनिर्भरतेचा अर्थ आत्मकेंद्री होणे नव्हे; तर जागतिक स्पर्धेत स्वतःच्या बळावर उभे राहणे, हाच त्याचा खरा अर्थ आहे. संरक्षण आणि आकर्षण यांच्यात अडकून राहिलेली धोरणे भारताला पुढे नेऊ शकत नाहीत. निर्णय घ्यावेच लागतील. स्पष्ट, धाडसी आणि वास्तववादी. अन्यथा, आपण केवळ घोषणा बदलत राहू आणि संधी हातातून निसटत जातील.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या २०२६-२७ अंदाजपत्रकाचा आढावा

### नागरी केंद्रित विकास, पारदर्शकता आणि दीर्घकालीन नियोजनावर भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या तयारीसाठी दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आढावा बैठक पार पडली. आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत नागरी केंद्रित विकास, आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि परिणामकारक अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात आला.

अंदाजपत्रक तयार करताना शहरातील नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण होणाऱ्या विकासकामांना प्राधान्य देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करून नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार सुविधा देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाला लोकप्रतिनिधींचे सहकार्य लाभणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. बैठकीस महापौर रवि लांडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, अतिरिक्त आयुक्त, सह आयुक्त, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य अभियंते, आरोग्य व वैद्यकीय अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

**आर्थिक स्थितीचा सखोल आढावा**

मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा सविस्तर आढावा मांडला. सर्वसाधारण निधी, मुदत ठेवी, विद्यमान कर्ज, मागील चार वर्षांतील उत्पन्न-खर्चाचा ताळेबंद, मासिक महसुली गरजा, कर्मचाऱ्यांचे मानधन, दायित्व निधी तसेच करसंकलन विभागाची कामगिरी यांचा तपशील बैठकीत सादर करण्यात आला.

**भरीव तरतूद आवश्यक**

महापौर रवि लांडगे यांनी शहराचा विकास नागरिकांच्या जीवनमानाशी थेट जोडलेला असल्याचे सांगत पाणीपुरवठा, आरोग्य, वैद्यकीय सेवा, पर्यावरण व क्रीडा सुविधा यावर भरीव निधीची तरतूद करण्याची गरज अधोरेखित केली. सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयातूनच नागरिकांपर्यंत सेवा प्रभावीपणे पोहोचू शकतील, असे मत व्यक्त केले.

## MIT वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीत सांस्कृतिक महोत्सवादरम्यान राडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी येथे आयोजित जागतिक सांस्कृतिक महोत्सवादरम्यान मंगळवारी संध्याकाळी तोडफोडीची घटना घडल्याने कॅम्पसमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले. वार्षिक कार्यक्रम सुरू असताना काही अज्ञात व्यक्तींनी कॅम्पसमध्ये प्रवेश करून बांगलादेशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फूड स्टॉलची तोडफोड केल्याचा आरोप आहे. तसेच बांगलादेशाचा ध्वज जाळल्याचीही चर्चा रंगली असून या प्रकारामुळे काही काळ कार्यक्रमात गोंधळ उडाला.

या महोत्सवात विविध देशांचे खाद्यपदार्थ, संगीत आणि सांस्कृतिक परंपरा सादर केल्या जात होत्या. भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी

**+ बांगलादेशाच्या स्टॉलची तोडफोड**

मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, काही व्यक्ती अचानक कॅम्पसमध्ये घुसून संबंधित स्टॉलला लक्ष्य केले. या घटनेमुळे विद्यार्थी आणि आयोजकांमध्ये घबराट पसरली. एमआयटी-डब्ल्यूपीयूचे रजिस्ट्रार गणेश बी. पोकळे यांनी सांगितले की, विद्यापीठ प्रशासनाने घटनेची गंभीर दखल घेतली असून पोलिसांकडे औपचारिक तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. अनधिकृत व्यक्तींनी कॅम्पसमध्ये प्रवेश कसा केला, याची चौकशी केली जात आहे. विद्यापीठाने सर्व विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि आदरयुक्त वातावरण राखण्याची बांधिलकी व्यक्त केली आहे.v

## ड्रेनेज दुरुस्तीच्या नावाखाली सेवानिवृत्त अधिकाऱ्याला ६.७० कोटींचा गंडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरातील सायबर व आर्थिक फसवणुकीच्या वाढत्या घटनांमध्ये आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ड्रेनेजलाइन दुरुस्तीच्या नावाखाली एका सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्याला तब्बल ६ कोटी ७० लाख ३७ हजार ५०० रुपयांचा गंडा घालण्यात आल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी ६१ वर्षीय तक्रारदाराने विश्रामबाग पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून अनेक संशयितांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार हे सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामधून अतिरिक्त संचालक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या आईच्या नावे नवी पेठ परिसरात भाड्याने दिलेले घर आहे. संबंधित घरातील भाडेकरूने ड्रेनेज तपासणीसाठी आलेल्या व्यक्तीशी संपर्क साधण्यास सांगितले. त्यानंतर संदीप चव्हाण नावाच्या व्यक्तीने स्वतःला महापालिकेचा अधिकारी असल्याचे सांगून स्वतंत्र ड्रेनेजलाइन टाकण्याचा प्रस्ताव दिला.

प्रारंभी ६५ हजार रुपये खर्च सांगून ऑनलाइन रक्कम घेतल्यानंतर विविध कारणे, अतिरिक्त परवानग्या व दंडाची भीती दाखवत आरोपींनी टप्प्याटप्प्याने मोठी रक्कम उकळली. जून २०२५ पर्यंत तक्रारदारांकडून कोट्यवधी रुपये घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात आदित्य चव्हाण, जितेन सोळंकी, शर्मा, राउत, महाजन तसेच बँक मॅनेजर आणि न्यायाधीश असल्याची बतावणी करणाऱ्या अनोळखी व्यक्तींचा समावेश आहे. पोलिसांनी संबंधित खात्यांची चौकशी सुरू केली आहे.

## अमृतमहोत्सवी वर्षात संविधानाचा वैचारिक जागर!

### लोकशाही मूल्यांवर ठाम भाष्य; प्रा. डॉ. जयसिंह ओहोळ यांच्या पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** पुणे शहरातील कोरेगाव पार्क येथील मौलाना अबुल कलाम आझाद भवन येथे दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी हिवरे गावचे सुपुत्र प्रा. डॉ. जयसिंह ओहोळ लिखित 'भारतीय संविधान आणि लोकशाही : अमृतमहोत्सवी वाटचाल – एक दृष्टिक्षेप' या महत्त्वपूर्ण ग्रंथाचा प्रकाशन सोहळा उत्साहपूर्ण व वैचारिक वातावरणात संपन्न झाला. संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमाने उपस्थितांमध्ये लोकशाही मूल्यांविषयी नवचैतन्य निर्माण केले.

या ग्रंथाचे प्रकाशन राजकीय विश्लेषक केशव वाघमारे, लेखक श्रीरंजन आवटे, प्रा. नितीन तळपाडे, सागर काकडे, हृदयमानव अशोक, पैगंबर शेख आणि मतीन शेख यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध वक्ते व संविधान अभ्यासक प्रा. ॲड. संभाजी मोहीते होते.

प्रकाशनप्रसंगी बोलताना केशव वाघमारे म्हणाले, "संविधान आणि लोकशाहीबद्दल एकीकडे भक्तिभावाने लेखन-वक्तव्ये होत असताना दुसरीकडे संविधानिक मूल्यांची फारकत घेतली जात आहे. अशा काळात संविधानिक आणि लोकशाही मूल्यांबद्दल आंतरदृष्टी देणारे हे पुस्तक म्हणजे एक प्रभावी वैचारिक हस्तक्षेप आहे." त्यांनी या ग्रंथाला वर्तमान राजकीय वास्तवाचे चिकित्सक विश्लेषण करणारा महत्त्वाचा दस्तावेज असेही संबोधले.

लेखक श्रीरंजन आवटे यांनी नमूद केले की, "डॉ. ओहोळ यांनी स्वातंत्र्योत्तर भारताच्या राजकीय वाटचालीचा घेतलेला वेध अत्यंत चिंतनशील आहे. भूतकाळाचा आढावा घेतानाच वर्तमानातील आव्हानांचे विश्लेषण करून त्यांनी भविष्यदिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे." या ग्रंथाला राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडींचे विश्लेषक व दैनिक सकाळचे संपादक श्रीराम पवार यांची प्रस्तावना लाभली आहे. प्रस्तावनेत ते म्हणतात, "संविधानाच्या पंच्याहत्तरी निमित्ताने अनेक पुस्तकं प्रकाशित झाली; त्यात डॉ. जयसिंह ओहोळ यांचं हे पुस्तक मराठीत महत्त्वाची भर घालणारं आहे. घटना निर्मितीपासून ते सध्याच्या आव्हानांपर्यंतचा विस्तृत पट या पुस्तकातून उलगडतो." कार्यक्रमास मिलिंद बोकेफोडे, रविंद्र भोसले, वसंत पातारे तसेच "आम्ही भारताचे लोक" आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ, पुणे टीमचे ॲड. नितीन घोडके, राज्यघटना अभ्यासक मार्गदर्शक संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर, प्रशांत जगताप, प्रदीप पैठणपगार, मिलिंद सोनकांबळे, शंकर गायकवाड, हेमंत ठाकरे, सौरभ पाटील यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर, कुटुंबीय, मित्रमंडळी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संविधानाच्या मूल्यांबाबत सखोल चिंतन घडवून आणणारा आणि लोकशाहीच्या वाटचालीचा चिकित्सक आढावा घेणारा हा ग्रंथ आगामी काळात अभ्यासक, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## एप्रिलअखेर नालेसफाई पूर्ण करा; महापौर मंजूषा नागपुरे यांचे कडक आदेश

### पूरधोका टाळण्यासाठी प्रशासन सज्ज; नदीसुधार प्रकल्पाचा अहवाल तीन दिवसांत सादर करण्याच्या सूचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील पूरस्थिती टाळण्यासाठी पुणे महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला कठोर निर्देश दिले आहेत. शहरातील सर्व नालेसफाई व ड्रेनलाइन स्वच्छतेची कामे ३० एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण करावीत, असा स्पष्ट आदेश महापौरांनी दिला असून कोणत्याही प्रकारचा विलंब सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी ठामपणे बजावले आहे.

गेल्या काही वर्षांत मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक भागांत पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे आणि नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पूरधोका निर्माण होणे अशा समस्या प्रकर्षाने समोर आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर यंदा पावसाळ्यापूर्वीच सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्याचा निर्धार महापालिकेने केला आहे. पूरप्रवण क्षेत्रांची अद्ययावत यादी तयार करून त्या भागांत विशेष लक्ष देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

महापौरांनी पंपिंग स्टेशनची तपासणी करून ती पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. आवश्यक ती यंत्रसामग्री, मनुष्यबळ आणि आपत्कालीन पथके तैनात ठेवावीत, तसेच संभाव्य आपत्कालीन परिस्थितीसाठी पूर्वतयारी आराखडा तयार करावा, असेही त्यांनी सांगितले. ड्रेनलाइन आणि पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याच्या मार्गांमध्ये अडथळे राहू नयेत, यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पाच्या कामांची प्रगतीही महापौरांनी गांभीर्याने घेतली आहे. या प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तीन दिवसांत महापौर कार्यालयात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नदीकाठच्या भागांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देण्याचे संकेत यामधून मिळत आहेत. पावसाळ्यात रस्त्यांवर पाणी साचून अपघात किंवा वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी नव्या खोदकामांना परवानगी देण्याची अंतिम तारीख निश्चित करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. सध्या सुरू असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करून रस्ते पूर्वस्थितीत आणावेत, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

**पूरधोक्याच्या भागांची प्रत्यक्ष पाहणी करणार**

● महापौर मंजूषा नागपुरे लवकरच पूरधोक्याच्या भागांची प्रत्यक्ष पाहणी करणार असून महापालिका आयुक्त व विभागप्रमुखांना दैनंदिन प्रगती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे प्रशासनातील जबाबदारी निश्चित होऊन कामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आगामी पावसाळ्यात नागरिकांना सुरक्षित आणि सुकर जीवनमान देण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत असून, वेळेत नालेसफाई पूर्ण झाल्यास शहरातील पूरस्थितीवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल, असा प्रशासनाचा दावा आहे.

## मोशीतील ट्रान्सपोर्ट कंपनीतून दीड लाखांचे लोखंडी पार्ट्स गायब; चालकाविरुद्ध गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** मोशी येथील एका ट्रान्सपोर्ट कंपनीतून सुमारे १ लाख ५० हजार रुपयांच्या लोखंडी पार्ट्सची अफरातफर झाल्याचा प्रकार उघडकीस आला असून संबंधित चालकाविरुद्ध भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान बोऱ्हाडे वस्ती, मोशी येथील लॉगवे ट्रान्सपोर्टमधून लोखंडी पार्ट्सचा माल पिकअप गाडी (एमएच १४ जेएल ८३४८) द्वारे रवाना करण्यात आला होता. हा माल नऱ्हे येथील एका इंजिनिअरिंग कंपनीत पोहोचविणे अपेक्षित होते. कंपनीने विश्वासाने संबंधित चालकाकडे वाहन व माल सोपविला होता.

मात्र आरोपीने ठरलेल्या ठिकाणी माल न पोहोचवता तो परस्पर विक्री केल्याचा आरोप आहे. यानंतर पिकअप गाडी नवी मुंबई विमानतळाजवळ सोडून आरोपी फरार झाला, अशी तक्रार फिर्यादीने दिली आहे. इरफान असारी (वय २६, रा. नेतासुर हुराब्बा, महाराजगंज, उत्तर प्रदेश) असे आरोपीचे नाव असून त्याच्याविरुद्ध विश्वासघात व अपहाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पानसरे करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### उघड्या खड्ड्यात पडून पाच वर्षीय बालकाचा मृत्यू

**लोणी काळभोर :** कोल्हापूरच्या जवाहरनगर परिसरात उघड्या खड्ड्यात पडून पाच वर्षीय इजान अक्रम बारगीरचा मृत्यू झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. सरनाईक वसाहतीत आठ वर्षांपूर्वी अपूर्ण राहिलेल्या बांधकामाचा सुमारे २० फूट खोल खड्डा पाण्याने भरलेला होता. बुधवारी दुपारी खेळताना इजान त्यात पडला. शेवाळ साचल्याने धोका लक्षात आला नाही. स्थानिकांनी वारंवार तक्रारी करूनही कारवाई न झाल्याने प्रशासनावर निष्काळजीपणाचा आरोप होत असून जबाबदारांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

### शेतजमिनीच्या वादातून महिलेला मारण्याची धमकी

**लोणी काळभोर :** लोणी काळभोर (ता. हवेली) येथे शेतजमिनीवर बळजबरीने ताबा घेत ज्येष्ठ महिलेला जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. २६ जानेवारी रोजी राहिंजवस्ती परिसरातील गट क्र. ११२ मध्ये आरोपींनी ट्रॅक्टर घालून कोळपणी करत पालक व कांद्याची लागवड केली. जाब विचारण्यासाठी गेलेल्या अलका जागडे (वय ६८) यांना शिवीगाळ व धमकी देण्यात आल्याची फिर्याद आहे. सुरेश जागडे यांच्यासह सहा जणांवर लोणी काळभोर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

### हवेली दुय्यम निबंधक कार्यालय २ दिवस बंद; नोंदणी व्यवहार ठप्प

**आंबेगाव :** येथील हवेली दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक २० गेल्या दोन दिवसांपासून बंद असल्याने दस्त नोंदणीचे व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले आहेत. सहाय्यक दुय्यम निबंधक सेवानिवृत्त झाल्यानंतर नव्या अधिकाऱ्याने पदभार स्वीकारला नसल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. घर, प्लॉट व शेतजमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारांवर परिणाम होऊन नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

---

### वनविभागाची तात्काळ कारवाई; भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत गुन्हा दाखल

# काठापुर बुद्रुक येथे राखीव वनक्षेत्रात अतिक्रमणाचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील काठापुर बुद्रुक येथे राखीव वनक्षेत्रात काही अतिक्रमकांनी सामूहिकरित्या अपप्रवेश करून तात्पुरत्या कोप्या उभारण्याचा प्रयत्न केल्याची घटना बुधवारी दुपारी उघडकीस आली. मात्र वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ धडक कारवाई करत हे अतिक्रमण निष्कासित केले. याबाबतची माहिती मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली.

वनविभागाच्या हद्दीत काही व्यक्तींनी तात्पुरत्या स्वरूपाच्या झोपड्या उभारल्याचे समजताच जुन्नर वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. संबंधितांना समज देऊन कोप्या स्वतःहून काढून घेण्यास सांगण्यात आले. मात्र त्यांनी नकार दिल्याने वनविभागाने कारवाई करून सर्व तात्पुरत्या रचना हटवल्या. अतिक्रमकांनी सोबत आणलेले किराणा, भांडी, धान्य आदी साहित्य त्यांच्या ताब्यात देत त्यांना वनक्षेत्राबाहेर काढण्यात आले.

सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे यांनी सांगितले की, संबंधित अतिक्रमकांनी वनहक्क अधिनियम २००६ अंतर्गत दावा केला होता; मात्र १३ डिसेंबर २००५ पूर्वी वनक्षेत्रावर ताबा असल्याचा कोणताही अभिलेखी पुरावा सादर न केल्याने ग्रामस्तर, उपविभागीय आणि जिल्हास्तरीय समित्यांनी त्यांचे दावे यापूर्वीच नामंजूर केले आहेत. तसेच याआधीही त्यांनी केलेले अतिक्रमण न्यायालयाने बेकायदेशीर ठरवून त्यांना दोषी ठरविले आहे. सध्या या प्रकरणी राष्ट्रीय जनजाती आयोग, दिल्ली येथे दावा प्रलंबित असल्याची माहितीही त्यांनी दिली.

"राखीव वनक्षेत्रात अपप्रवेश करून अतिक्रमण करणे हे भारतीय वन अधिनियम १९२७ नुसार दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा असून तो दंडनीय अपराध आहे," असेही शिंदे यांनी स्पष्ट केले. ही कारवाई वनसंरक्षक आशिष ठाकरे (पुणे वनवृत्त) व उपवनसंरक्षक प्रशांत खाडे (जुन्नर) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. परिविक्षाधीन उपवनसंरक्षक लोकेश पाटील, सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण, चैतन्य कांबळे, वनपाल नीलम चव्हाण, वनरक्षक पूजा कांबळे आदी अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले. यावेळी माजी सरपंच अशोक करंडे, माजी उपसरपंच विशाल करंडे, पोलीस पाटील अमोल करंडे व ग्रामस्थ उपस्थित होते.

वनक्षेत्राचे संरक्षण आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी अशा कारवाया सातत्याने सुरू राहणार असल्याचा इशारा वनविभागाने दिला आहे.

---

## श्री छत्रपती साखर कारखान्याचा गाळप हंगाम यशस्वी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ १०४ दिवसांत ७.५६ लाख टन उसाचे गाळप

**भवानीनगर :** श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचा यंदाचा गाळप हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याची घोषणा करताना अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांनी "हा यशस्वी हंगाम सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शक्य झाला," असे मत व्यक्त केले. गाळप हंगामाच्या सांगता समारंभात कारखान्याच्या संचालिका सुचिता सपकळ व सचिन सपकळ यांच्या हस्ते गव्हाणीचे पूजन करण्यात आले.

या वेळी उपाध्यक्ष कैलास गावडे, संचालक अ‍ॅड. शरद जामदार, शिवाजी निंबाळकर, रामचंद्र निंबाळकर, पृथ्वीराज घोलप, गणपतराव कदम, प्रशांत दराडे, अजित नरुटे, विठ्ठलराव शिंगाडे, अनिल काटे, बाळासाहेब कोळेकर, संतोष मासाळ, निलेश टिळेकर, सतीश देवकाते, अशोक पाटील, मंथन कांबळे, डॉ. योगेश पाटील, तानाजी शिंदे, माधुरी राजपुरे, कार्यकारी संचालक अशोक जाधव, जनरल मॅनेजर हनुमंत करवर, तांत्रिक सल्लागार महादेव निकम, कामगार नेते युवराज रणवरे आदी उपस्थित होते. अध्यक्ष जाचक म्हणाले की, यंदाच्या हंगामात संचालक मंडळ, अधिकारी व कामगार यांनी अत्यंत काळजीपूर्वक आणि उत्कृष्ट नियोजन करून कारखाना चालविला. किमान दहा लाख टन गाळपाचे उद्दिष्ट होते; मात्र अतिवृष्टीमुळे उसाचे उत्पादन घटल्याने अपेक्षित गाळप साध्य होऊ शकले नाही. यंदाच्या हंगामात १०४ दिवसांत ७ लाख ५६ हजार २८५ टन उसाचे गाळप करण्यात आले असून ८ लाख ५६ हजार २०० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. सहवीज निर्मिती प्रकल्पातून आतापर्यंत ३ कोटी ९२ लाख ५१ हजार ३०० युनिट वीज निर्मिती झाली. त्यापैकी अंतर्गत वापर वजा जाता २ कोटी ५७ लाख ६६ हजार युनिट वीज निर्यात करण्यात आली. मागील हंगामाच्या तुलनेत साखर उताऱ्यात वाढ होऊन पुणे जिल्ह्यात कारखान्याने दुसरा क्रमांक मिळविला आहे.

---

## विवेक वळसे पाटील यांच्या विजयाने फेडली प्रतिज्ञा; डॉ. विठ्ठल गाढवे यांनी पुन्हा चप्पल परिधान केली

### जिल्हा परिषद निवडणुकीतील विजयाचा जल्लोष

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव तर्फे अवसरी जिल्हा परिषद गटाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे उमेदवार विवेक वळसे पाटील यांनी दणदणीत विजय मिळवत समर्थकांमध्ये उत्साहाची लाट निर्माण केली. या विजयानंतर शिंगवे गावातील डॉ. विठ्ठल गाढवे यांनी घेतलेली प्रतिज्ञा पूर्ण झाली असून त्यांनी पुन्हा चप्पल परिधान केली.

निवडणूक प्रचारादरम्यान डॉ. गाढवे यांनी "विवेक वळसे पाटील विजयी होईपर्यंत मी चप्पल घालणार नाही," अशी प्रतिज्ञा जाहीर केली होती. आपल्या उमेदवारावरील निष्ठा आणि अढळ विश्वास व्यक्त करण्यासाठी त्यांनी ही भूमिका घेतली होती. प्रचाराच्या काळात ते मित्रमंडळींसह अनवाणी फिरत गावागावात संपर्क दौरे, बैठका आणि जनसंपर्क करत होते. त्यांच्या या भूमिकेची तालुक्यात व्यापक चर्चा झाली होती.

मतमोजणीच्या दिवशी विवेक वळसे पाटील यांच्या विजयाची अधिकृत घोषणा होताच शिंगवे गावात जल्लोष सुरू झाला. फटाक्यांची आतषबाजी, गुलालाची उधळण आणि ढोल-ताशांच्या गजरात कार्यकर्त्यांनी आनंद साजरा केला. याच वेळी विजयी उमेदवार विवेक वळसे पाटील यांनी स्वतः डॉ. गाढवे यांना कोल्हापुरी चप्पल परिधान करून त्यांची प्रतिज्ञा पूर्ण केली. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या क्षणाचे स्वागत केले.

डॉ. विठ्ठल गाढवे म्हणाले, "ही प्रतिज्ञा मी जनतेच्या विश्वासासाठी आणि आपल्या उमेदवाराच्या विजयासाठी केली होती. जनतेने दिलेला कौल आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. आता विकासकामांना गती देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करू." विवेक वळसे पाटील यांनीही डॉ. गाढवे यांच्या निष्ठेचे कौतुक करत, "ही निवडणूक जनतेच्या विश्वासाची आहे. कार्यकर्त्यांच्या त्याग, मेहनत आणि निष्ठेमुळेच हा विजय शक्य झाला,"

---

## रुई येथील श्री बाबीर विद्यालयाची सेंद्रिय परसबाग फुलली; भाज्यांचा पोषणआहारात समावेश

### मुख्याध्यापक व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचा अभिनव उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रुई (ता. इंदापूर) :** येथील श्री बाबीर विद्यालयात विद्यार्थ्यांनी सेंद्रिय शेतीचा सुंदर नमुना उभा करत शाळेच्या मोकळ्या जागेत फुलझाडे, फळझाडे आणि विविध भाजीपाला लावून आदर्श परसबाग फुलवली आहे. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभागातून उभारलेला हा उपक्रम सध्या ग्रामस्थांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

विद्यालयाचे मुख्याध्यापक जगन्नाथ पाटील व पर्यवेक्षक धनाजी गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली उस्मान मुलाणी आणि धनेश भोईर यांनी या परसबागेच्या निर्मितीसाठी विशेष परिश्रम घेतले. नियोजनबद्ध पद्धतीने जमिनीची मशागत, सेंद्रिय खतांचा वापर, बीज पेरणी आणि निगा राखण्याचे काम करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत शाळेच्या परिसराला हिरवाईची किनार दिली. शिक्षिका मीरादेवी पाटील आणि प्रतीक्षा पाटील मॅडम यांनी विद्यार्थिनींसोबत खुरपणी, तणनियंत्रण तसेच तयार झालेला भाजीपाला तोडण्याचे काम केले. तर विद्यालयातील कर्मचारी संजय भगत यांनी पाण्याचे योग्य नियोजन करून बागेची सातत्याने निगा राखली. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून ही परसबाग आज बहरलेली दिसत आहे. या परसबागेत वांगी, मिरची, कोथिंबीर, घेवडा, भोपळा यांसारख्या भाज्यांचे उत्पादन घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे या सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या भाज्यांचा वापर शालेय पोषणआहारात केला जात आहे. इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना या ताज्या भाज्यांची भाजी शिजवून देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना पौष्टिक व रसायनमुक्त अन्न मिळत असून त्यांच्या आरोग्यासाठी हा उपक्रम अत्यंत लाभदायक ठरत आहे.

परसबाग उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शेतीचे प्रत्यक्ष ज्ञान मिळत आहे. बियाणे पेरणे, रोपांची निगा राखणे, सेंद्रिय शेतीचे महत्त्व समजून घेणे, पर्यावरण संवर्धनाची जाणीव होणे अशा अनेक बाबी या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवल्या जात आहेत. 'शिकत-करत' या तत्त्वावर आधारित हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरत आहे.

विद्यालयाच्या या अभिनव प्रयोगाचे ग्रामस्थांकडून सर्वत्र कौतुक होत आहे. ग्रामीण भागात शालेय स्तरावर सेंद्रिय शेतीचा असा प्रयोग राबवून विद्यार्थ्यांना आरोग्यदायी अन्न व पर्यावरणपूरक शिक्षण देण्याचा घेतलेला पुढाकार निश्चितच अनुकरणीय आहे.

---

## कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर विद्यार्थ्यांच्या सहलीच्या एसटी बसचा अपघात

### चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बस अचानक पलटली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळेफाटा :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात खामुंडी गावाजवळ कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर विद्यार्थ्यांना सहलीसाठी घेऊन जाणाऱ्या एसटी बसचा अपघात झाल्याची घटना गुरुवार, दिनांक १२ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ७ वाजताच्या दरम्यान घडली.

आळेफाटा बाजूकडून कल्याणच्या दिशेने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बस अचानक पलटी झाली. बसमध्ये सहलीसाठी निघालेले विद्यार्थी व शिक्षक प्रवास करत होते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. घटनेनंतर पोलिस व आपत्कालीन यंत्रणा तत्काळ दाखल झाल्या असून जखमींना जवळील रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी टळल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. अपघाताचे नेमके कारण तपासात स्पष्ट होणार असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. प्रशासनाने नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

---

## ओढ्यात शिर नसलेला मृतदेह; महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**महागाव-मासेवाडी :** महागाव-मासेवाडी रस्त्यावरील 'घंटीचा झरा' या ओढ्यात शिर नसलेला विद्रूप अवस्थेतील मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. कपडे, चप्पल, बांगड्या आणि हातातील काळा दोरा यावरून प्राथमिक ओळख पटली आहे. मात्र मोबाईल सापडलेला नसल्याने पोलिसांनी कॉल डिटेल रेकॉर्ड, शेवटचे लोकेशन व संपर्कातील व्यक्तींची चौकशी सुरू केली आहे. मृतदेहाचे शिर अपघातात वेगळे झाले की मुद्दाम कापले, याबाबत फॉरेन्सिक अहवाल निर्णायक ठरणार आहे. गुन्हा अन्यत्र करून ओढ्यात मृतदेह टाकल्याची शक्यता तपासात आहे. या घटनेमुळे ग्रामीण भागातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

---

## वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून रक्तदान शिबिर; २४१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

### विठ्ठल ढोबळे यांच्या समाजाभिमुख उपक्रमाचे दिलीपराव वळसे पाटील यांच्याकडून कौतुक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पारगाव (ता. आंबेगाव) :** वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळत समाजोपयोगी उपक्रम राबवण्याचा आदर्श पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल सिताराम ढोबळे यांनी घालून दिला आहे. त्यांच्या पुढाकारातून आयोजित भव्य रक्तदान शिबिरात तब्बल २४१ रक्तदात्यांनी रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपली. या उपक्रमाचे माजी मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांनी विशेष कौतुक केले.

विठ्ठल ढोबळे हे दरवर्षी वाढदिवसानिमित्त विविध समाजाभिमुख उपक्रम राबवत असतात. यंदाही त्यांनी वाढदिवस साजरा करण्याऐवजी रक्तदान शिबिराचे आयोजन करून सामाजिक संदेश दिला. ग्रामीण भागातील तरुणांनी एकत्र येऊन अशा प्रकारचे विधायक कार्य सातत्याने केले पाहिजे, असे मत गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका यांनी व्यक्त केले. विशेष म्हणजे या शिबिरात ५ महिलांनीही रक्तदान करून स्त्रीशक्तीचा सहभाग अधोरेखित केला. या शिबिरास भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, संचालक रामचंद्र ढोबळे, बाळासाहेब घुले, ज्ञानेश्वर अस्वारे, विलास लबडे, कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे, राजेश वाकचौरे, ब्रिजेश लोहोट, अनिल बोंबले, सुनील टाव्हरे, दत्तात्रय वैद, विरेंद्र ढोबळे, ह.भ.प. निवृत्ती महाराज लोखंडे, उपसरपंच हिरामण गोरडे तसेच परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

चक्रेश्वर मेडिकल फाऊंडेशन व चाकण ब्लड सेंटर यांच्या सहकार्याने शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे शिबिर यशस्वी ठरले. माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी सर्व रक्तदाते, आयोजक व सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचे आभार मानले. वाढदिवस साजरा करण्याच्या पारंपरिक पद्धतीला सामाजिक सेवेची जोड देत विठ्ठल ढोबळे यांनी समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

---

### नवी मुंबई-पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला वेग; भूसंपादनाला अंतिम मुदतीची शासनाकडून स्पष्ट दिशा

# पुरंदर विमानतळासाठी १ जून पर्यंत भूसंपादन पूर्ण करण्याचे फडणवीसांचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** प्रस्तावित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला अखेर निर्णायक वेग मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादनाची प्रक्रिया १ जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट व कडक आदेश प्रशासनाला दिले आहेत. राज्याच्या पायाभूत विकासातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, पुणे व पश्चिम महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार असल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले.

पुरंदर तालुक्यात उभारण्यात येणाऱ्या या आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी सुमारे तीन हजार एकर जमिनीची आवश्यकता आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पासाठी ९६ टक्के शेतकऱ्यांची संमतीपत्रे आधीच प्राप्त झाली असून, त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेला मोठा दिलासा मिळाला आहे. उर्वरित प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि संबंधित यंत्रणांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

या प्रकल्पासाठी अंदाजे ६ हजार कोटी रुपयांचा निधी आवश्यक असून, तो कर्जस्वरूपात उभारण्यास शासनाने तत्त्वतः मंजुरी दिली आहे. निधी व्यवस्थापन आणि अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी विशेष हेतू प्राधिकरण (SPV) स्थापन करण्यात आले आहे. या प्राधिकरणामार्फत प्रकल्पाच्या सर्व टप्प्यांवर समन्वय साधून कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) मार्फत भूसंपादनाची प्रत्यक्ष प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येणार आहे. भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना योग्य व पारदर्शक पद्धतीने मोबदला देण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर सोपविण्यात आली आहे. मोबदला वितरणानंतर तातडीने बांधकाम व पायाभूत सुविधा उभारणीच्या कामांना प्रारंभ केला जाणार आहे.

पुरंदर विमानतळाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे पुण्यातील विद्यमान विमानतळावरील वाढत्या प्रवासी व मालवाहतुकीच्या ताणाला पर्याय उपलब्ध करून देणे. सध्या पुणे विमानतळाची क्षमता मर्यादित असल्याने नवीन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विमानतळाची गरज प्रकर्षाने जाणवत आहे.

---

## धक्कादायक..! दागिन्यांच्या वादातून जावेकडून जावेची निर्घृण हत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यात दागिन्यांच्या वादातून मोठ्या जावेने धाकट्या जावेची गळा आवळून हत्या करून मृतदेह जाळल्याच्या थरारक प्रकरणी न्यायालयाने आरोपी महिलेला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. गीता पाडुळे असे दोषी महिलेचे, तर उज्वला पाडुळे असे मृत महिलेचे नाव आहे.

उज्वलाचे लग्न २९ नोव्हेंबर २०२२ रोजी किरण पाडुळे यांच्याशी झाले होते. माहेरी जाताना तिने मंगळसूत्र व सोन्याची अंगठी कपाटात ठेवली होती. परत आल्यानंतर दागिने गायब झाल्याचे तिच्या लक्षात आले. यावरून उज्वला व तिची जाऊ गीता यांच्यात तीव्र वाद झाला. चोरीचा आरोप झाल्याच्या संतापातून २ फेब्रुवारी २०२३ रोजी गीताने घरातच उज्वलाचा गळा आवळून खून केला.

गुन्हा लपवण्यासाठी मृतदेह जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. संशय टाळण्यासाठी गीताने अज्ञात व्यक्तीने हल्ला केल्याचा बनाव रचत स्वतःलाही चाकूने जखमा केल्या. मात्र, माढा पोलिसांनी सखोल तपास करून घटनाक्रमातील विसंगती उघड केल्या. ठोस पुरावे व १२ साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे बार्शी न्यायालयाने गीताला जन्मठेप व दंडाची शिक्षा ठोठावली.

## सारांश वृत्त

### हैदराबाद विमानतळ; बॉम्बची धमकी

**हैदराबाद :** येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय (आरजीआयए) विमानतळावरील अधिकाऱ्यांनी टर्मिनलची कसून तपासणी केल्यानंतर बॉम्बच्या धमकीला खोटे घोषित केले आहे. गुरुवारी पोलिसांनी सांगितले की, त्यांना बहरीनहून गल्फ एअरचे विमान येण्यापूर्वी विमानतळावर स्फोट होण्याची शक्यता असलेला ईमेल मिळाला. बुधवारी रात्री आरजीआय विमानतळ ग्राहक समर्थनाला एका अज्ञात ईमेल आयडीवरून बॉम्ब धोक्याचा ईमेल मिळाला होता.

### आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन

**अमरावती :** आंध्र प्रदेश विधानसभेचे अध्यक्ष सी. अय्यन्नापत्रुडू यांनी गुरुवारी म्हटले की, आमदार सभागृहाची प्रतिष्ठा वाढविण्यात यशस्वी होऊ शकत नसले तरी, जनतेच्या नजरेत त्यांना "ती कमी करण्याचा कोणताही अधिकार नाही". अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीच्या गोंधळानंतर त्यांचे हे वक्तव्य आले आहे. वायएसआरसीपीच्या आमदारांनी घोषणाबाजी करून आणि कागदपत्रे फाडून राज्यपालांच्या भाषणात व्यत्यय आणला. आमंत्रित विद्यार्थ्यांच्या गॅलरीसमोर झालेल्या गोंधळाबद्दल त्यांनी निराशा व्यक्त केली.

### मिझोराममध्ये मॉर्फिनसह दोन जणांना अटक

**आयझॉल :** मिझोरामच्या सैतुअल जिल्ह्यात ३.५ कोटी रुपयांच्या मॉर्फिनसह दोन जणांना अटक करण्यात आली, असे आसाम रायफल्सने गुरुवारी सांगितले. मणिपूरच्या सीमेजवळ असलेल्या ग्नोपा गावात एका चेकपोस्टवर आसाम रायफल्सच्या जवानांनी एका गुप्त माहितीच्या आधारे एक वाहन अडवले, असे त्यात म्हटले आहे. वाहनाची कसून तपासणी केली असता ३.५१ किलो मॉर्फिन जप्त करण्यात आले, असेही त्यात म्हटले आहे.

## अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा काँग्रेसवर हल्लाबोल

# देश विकणारा कोणी जन्माला आला नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** "देश विकणारा अजून कोणी जन्माला आलेला नाही आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी असे कधीही करणार नाहीत. उलट २०१३ मध्ये बाली येथे झालेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर स्वाक्षरी करून काँग्रेसनेच शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले होते," असा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी बुधवारी लोकसभेत केला. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना त्यांनी विरोधकांच्या आरोपांचा तीव्र शब्दांत समाचार घेतला.

राहुल गांधी यांनी सरकारवर 'देश विकल्याचा' आरोप केल्याच्या पार्श्वभूमीवर बोलताना सीतारमण म्हणाल्या की, भारताला विकू शकेल असा कोणताही व्यक्ती आजवर जन्माला आलेला नाही. किरेन रिजिजू यांनी म्हटल्याप्रमाणे असा 'माई का लाल' अजून जन्मायचा आहे, असे त्या म्हणाल्या. डेटा लोकलायझेशनच्या मुद्द्यावर त्यांनी स्पष्ट केले की, सरकार देशातच डेटा सेंटर्स उभारण्यावर भर देत असून त्यामुळे भारतीयांचा डेटा सुरक्षित राहील आणि रोजगाराच्या संधीही निर्माण होतील.

अर्थमंत्र्यांनी २०१३ मध्ये इंडोनेशियातील बाली येथे झालेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या कराराचा उल्लेख करत काँग्रेसवर टीका केली. त्या म्हणाल्या की, त्या करारामुळे २०१७ नंतर भारताला शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करणे आणि गरिबांना रेशन देणे अशक्य झाले असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेत आल्यानंतर हा अडथळा दूर केला. अन्यथा देशातील शेतकरी अडचणीत सापडला असता, असे त्यांनी नमूद केले.

महिला सुरक्षेच्या मुद्द्यावरून सीतारमण यांनी पश्चिम बंगाल सरकारवरही टीकास्त्र सोडले.

बंगालमध्ये कायद्याऐवजी बॉम्ब चालतात, अशी टिप्पणी करत एका महिला मुख्यमंत्र्यांनी महिलांना रात्री बाहेर पडू नये असा सल्ला देणे हे कायदा व सुव्यवस्था अपयशी ठरत असल्याचे लक्षण असल्याचे त्यांनी सांगितले.

केरळ सरकारवर टीका करताना त्या म्हणाल्या की, कम्युनिस्ट शासित केरळमध्ये गुंतवणूकदारांना पळवून लावले जात आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या आकडेवारीनुसार केरळमध्ये अनुसूचित जातींवरील गुन्ह्यांचे प्रमाण देशात सर्वाधिक असल्याचे त्यांनी सभागृहात नमूद केले. तसेच, २००९ मधील शर्म अल शेख कराराचा दाखला देत सीतारमण यांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंह यांच्यावरही निशाणा साधला. पाकिस्तानच्या दहशतवादाचा मुद्दा बाजूला ठेवून तेव्हा समझोता करण्यात आला होता, असे सांगत आज तेच लोक वाटाघाटींचे धडे देत असल्याचा टोला त्यांनी लगावला.

### राहुल गांधींचे सदस्यत्व रद्द करण्यासाठी प्रस्ताव

● राहुल गांधी यांच्याविरुद्ध भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी गुरुवारी एक प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावात राहुल गांधी यांचे संसदेतील सदस्यत्व रद्द करावे तसेच त्यांना आजीवन निवडणूक लढवण्यास बंदी घालावी, अशी मागणी करण्यात आली आहे. भारत - अमेरिका व्यापार करारावरून राहुल गांधी यांनी बुधवारी केंद्र सरकारवर टीका केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देश विकल्याचा आरोप राहुल यांनी केला होता.

## काँग्रेस नेत्यांना बदनामीकारक विधाने करण्यास मनाई



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गुवाहाटी :** आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी दाखल केलेल्या ५०० कोटी रुपयांच्या मानहानीच्या खटल्याप्रकरणी गुवाहाटी येथील न्यायालयाने काँग्रेस नेते गौरव गोगोई, भूपेश बघेल आणि जितेंद्र सिंह यांना मुख्यमंत्री सरमांविरोधात कोणतीही बदनामीकारक विधाने करण्यास मनाई केली आहे. प्रत्यक्ष न्यायालयात हजर होईपर्यंत ही मनाई लागू राहणार आहे.

याचिकाकर्त्याच्या वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर वरिष्ठ विभाग क्रमांक एकचे दिवाणी न्यायाधीश नयनज्योती शर्मा यांनी बुधवारी अंतरिम मनाई आदेश जारी केला. या आदेशानुसार, संबंधित काँग्रेस नेते तसेच एका प्रमुख आसामी दैनिकाला न्यायालयात प्रत्यक्ष हजर होईपर्यंत याचिकाकर्त्याविरोधात कोणतेही बदनामीकारक विधान किंवा साहित्य तयार करणे, प्रकाशित करणे अथवा प्रसारित करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.

न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले आहे की, अंतरिम मनाई आदेश दिला नाही तर न्यायाला बाधा निर्माण होण्याची तसेच अनेक कार्यवाही उद्भवण्याची शक्यता आहे. या प्रकरणी न्यायालयाने सर्व प्रतिवादींना ९ मार्च रोजी प्रत्यक्ष हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

## 'काँग्रेससोबतची आघाडी अबाधित'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** द्रमुक आणि काँग्रेस यांच्यातील आघाडी पूर्णपणे अबाधित असून फूट पडल्याच्या चर्चा या केवळ अफवा आहेत, असे तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांनी बुधवारी स्पष्ट केले. युती सरकार किंवा सत्तावाटपाची कोणतीही शक्यता त्यांनी ठामपणे फेटाळून लावली.

एका कार्यक्रमात बोलताना स्टॅलिन म्हणाले की, सत्तावाटपाची संकल्पना तामिळनाडूच्या राजकीय परंपरेला मानवणारी नाही. हे काँग्रेसलाही चांगलेच माहीत आहे. काही जण जाणीवपूर्वक द्रमुक आणि काँग्रेसमध्ये गैरसमज निर्माण करण्यासाठी सत्तावाटपाचा मुद्दा पुढे आणत आहेत. मात्र, अशा प्रयत्नांना यश येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

द्रमुक-काँग्रेस आघाडीबाबत कोणताही संभ्रम नसल्याचे सांगताना स्टॅलिन म्हणाले की, राजकारणापलीकडे राहुल गांधी यांच्याशी आपले भावनिक नाते आहे. "मी राहुल गांधींना भाऊ मानतो आणि तेही मला तसाच मानतात. आमच्यात पूर्ण विश्वास आणि सामंजस्य आहे. काही लोकांना अपेक्षित असलेले विभाजन कधीही होणार नाही," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

काँग्रेसकडून जागावाटपाच्या चर्चेला विलंब होत असल्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आल्यानंतर स्टॅलिन यांच्या या वक्तव्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. मंगळवारी काँग्रेसच्या तामिळनाडू प्रभारी नेत्यांनी द्रमुककडून जागावाटप समिती जाहीर होण्यास उशीर होत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती.

दरम्यान, द्रमुकचे मंत्री आर. एस. राजकन्नप्पन आणि काही काँग्रेस नेत्यांमध्ये झालेल्या शाब्दिक वादामुळे आघाडीबाबत शंका निर्माण झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर हे विधान करण्यात आले आहे.

## वंदे मातरमची सक्ती हा धार्मिक स्वातंत्र्यावर हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील सर्वात मोठी मुस्लिम संघटना असलेल्या जमियत उलेमा-ए-हिंदने भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या नव्या मार्गदर्शक तत्त्वांवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. राष्ट्रगीत वंदे मातरमचे सर्व सहा श्लोक गाणे अनिवार्य करणारा हा निर्णय धार्मिक स्वातंत्र्यावर उघड हल्ला असल्याचा आरोप जमियतने गुरुवारी केला.

२८ जानेवारी रोजी केंद्रीय गृह मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, सरकारी कार्यक्रम आणि शाळांमध्ये राष्ट्रगीतापूर्वी वंदे मातरमचे सर्व सहा श्लोक गायले जाणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयावर प्रतिक्रिया देताना जमियत उलेमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना अर्शद मदनी यांनी सांगितले की, बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी लिहिलेल्या या गीतातील काही श्लोक मातृभूमीला देवतेच्या रूपात दर्शवतात, जे एकेश्वरवादी धर्मांच्या मूलभूत श्रद्धेच्या विरोधात आहे.

मुस्लिम फक्त अल्लाहचीच उपासना करतो. त्यामुळे अशा स्वरूपाचे गीत गाण्यास भाग पाडणे हे संविधानाच्या कलम २५ अंतर्गत मिळालेल्या धार्मिक स्वातंत्र्याचे तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचे उल्लंघन असल्याचे मदनी यांनी स्पष्ट केले. मुस्लिम समाज सर्व अडचणी सहन करू शकतो, मात्र ईश्वराच्या संकल्पनेत भागीदारी मान्य करू शकत नाही, असेही त्यांनी नमूद केले. या निर्णयाला एकतर्फी आणि जबरदस्तीचा ठरवत मदनी म्हणाले की, हा केवळ धार्मिक स्वातंत्र्यावरचा हल्ला नसून, अल्पसंख्याकांच्या घटनात्मक अधिकारांवर मर्यादा आणण्याचा पद्धतशीर प्रयत्न आहे. देशभक्ती सक्तीने लादून सिद्ध होत नाही. अशा निर्णयांमागे निवडणूक राजकारण, सांप्रदायिक अजेंडा आणि जनतेचे लक्ष मूलभूत प्रश्नांपासून विचलित करण्याचा हेतू असल्याचा आरोपही त्यांनी केला. देशावरचे खरे प्रेम घोषणांत नव्हे, तर चारित्र्य, त्याग आणि सेवेतून दिसून येते. त्यांनी इशारा दिला की, अशा निर्णयांमुळे देशाची शांतता, एकता आणि लोकशाही मूल्ये कमकुवत होतात.

दरम्यान, १९३७ साली वंदे मातरमला राष्ट्रीय गीताचा दर्जा देताना, गैर-हिंदू समाजाच्या धार्मिक भावना लक्षात घेऊन त्यातील काही श्लोक वगळण्यात आले होते. मातृभूमीला देवी दुर्गेचे रूप दिलेले श्लोक इस्लामसह इतर धर्मांच्या श्रद्धेला विरोधात असल्याने ते वगळण्यात आले होते. मात्र, हे श्लोक पुन्हा अनिवार्य करण्याची मागणी भाजपकडून दीर्घकाळापासून होत असल्याचेही जमियतने नमूद केले आहे.

## धर्मांतर किंवा आंतरजातीय विवाहामुळे जात बदलत नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अलाहाबाद :** एखादी व्यक्ती धर्म बदलू शकते; मात्र धर्मांतर केले तरी तिची जात बदलत नाही. त्याचप्रमाणे, आंतरजातीय विवाह झाल्यानंतरही महिलेची जन्माने असलेली जात कायम राहते, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

जातीवाचक शिवीगाळ व मारहाणीच्या आरोपप्रकरणी दाखल गुन्ह्यातील आरोपींनी केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती अनिल कुमार-दहावे यांच्या खंडपीठाने हे स्पष्ट केले. तक्रारदार महिलेने आरोपींनी आपल्याला मारहाण केली, शिवीगाळ केली आणि वादादरम्यान जातीवाचक शब्द वापरून अपमानित केल्याचा आरोप केला होता. या घटनेत स्वतःसह अन्य दोन जण जखमी झाल्याचा दावाही तिने केला होता. या प्रकरणी नऊ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले होते.

या प्रकरणात अलीगड येथील विशेष अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायदा न्यायालयाने भादंवि कलम ३२३, ३५४, ४५२, ५०६ तसेच अनुसूचित जाती-जमाती प्रतिबंधक कायद्याच्या कलम ३(१)(आर) अंतर्गत खटला चालविण्यासाठी आरोपींना समन्स बजावले होते. या आदेशाला आरोपींनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. आरोपींच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की तक्रारदार महिला जन्माने अनुसूचित जाती प्रवर्गातील असली, तरी तिने जाट समाजातील व्यक्तीशी विवाह केला आहे. त्यामुळे विवाहानंतर तिची जात बदलली असून अनुसूचित जाती-जमाती कायदा लागू होत नाही. तसेच, पूर्ववैमनस्यातून खोटी तक्रार दाखल करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. मात्र, सरकारी वकिलांनी हा युक्तिवाद फेटाळून लावत, दोन्ही बाजूंनी दाखल झालेले गुन्हे एकाच दिवशी घडले असल्याने केवळ पूर्ववैमनस्याचा आरोप ग्राह्य धरता येणार नाही, असे सांगितले.

## जैश-ए-मोहम्मद अजूनही सक्रिय असल्याचा इशारा

# भारताची डोकेदुखी वाढवणारा अहवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** गेल्या नोव्हेंबरमध्ये दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या भीषण स्फोटाबाबत संयुक्त राष्ट्रांच्या एका देखरेखी अहवालातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या या अहवालानुसार, दक्षिण आशियात बंदी घातलेल्या जिहादी संघटना अद्यापही सक्रिय असून, काही संघटना वर्षानुवर्षांच्या निर्बंधांनंतरही पूर्णपणे नष्ट झालेल्या नाहीत.

चार फेब्रुवारी रोजी सुरक्षा परिषदेला सादर करण्यात आलेल्या सत्तेतीसाव्या देखरेखी अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की जागतिक दहशतवादविरोधी यंत्रणा या प्रादेशिक संघटनांकडे अजूनही गंभीर धोका म्हणून पाहत आहेत. या अहवालात जैश-ए-मोहम्मद या संघटनेचाही विशेष उल्लेख करण्यात आला आहे. किमान एका सदस्य देशाच्या मूल्यांकनानुसार ही संघटना अद्याप सक्रिय असून मोठ्या हल्ल्यांचे नियोजन करण्याची तिची क्षमता कायम आहे, असे या अहवालात नमूद आहे.

अहवालानुसार, कडक निर्बंध, आर्थिक कारवाई आणि आंतरराष्ट्रीय दबाव असूनही काही जिहादी गट नष्ट न होता आपली रणनीती बदलत आहेत. मोठ्या आणि तात्काळ लक्ष वेधणाऱ्या हल्ल्यांऐवजी हे गट आता दीर्घकालीन, निवडक आणि उच्च परिणाम साधणाऱ्या हल्ल्यांकडे वळत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

देखरेखीच्या कागदपत्रांमध्ये समाविष्ट असलेल्या गुप्तचर माहितीनुसार, जैश-ए-मोहम्मद संघटना आपली अंतर्गत रचना पुन्हा संघटित करत असून, कार्यक्षमता वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. उघडपणे वारंवार हल्ले करण्याऐवजी कमी पण अधिक प्रभावी कारवायांवर भर दिला जात असल्याचे संकेत या अहवालातून मिळतात. यावरून आंतरराष्ट्रीय पातळीवरील तपासणी असूनही संघटना आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते.

या अहवालात नऊ नोव्हेंबर दोन हजार पंचवीस रोजी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटाचाही उल्लेख आहे. या हल्ल्यात पंधरा जणांचा मृत्यू झाला होता. एका सदस्य देशाने दिलेल्या माहितीनुसार हा स्फोट जैश-ए-मोहम्मदशी संबंधित असल्याचे म्हटले गेले आहे. मात्र, संयुक्त राष्ट्रांनी स्पष्ट केले आहे की हे मूल्यांकन संबंधित देशाकडून प्राप्त झाले असून, त्याची स्वतंत्र पुष्टी संयुक्त राष्ट्रांकडून करण्यात आलेली नाही.

## बिहारची केंद्राकडे ३ हजार कोटींची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पटना :** प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारा निधी अडकल्यामुळे बिहार सरकारने केंद्र सरकारकडे प्रलंबित ३ हजार कोटी रुपये तातडीने जारी करण्याची विनंती केली आहे. निधीअभावी मोठ्या प्रमाणावर घरबांधणी रखडल्याची माहिती विधानसभेत देण्यात आली.

विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान ग्रामीण विकास मंत्री शर्वण कुमार यांनी सांगितले की, केंद्र सरकारने जानेवारी महिन्यात ९१ कोटी रुपये जारी केले होते. मात्र, ही रक्कम सिंगल नोडल एजन्सी खाते नसलेल्या प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण लाभार्थ्यांना वितरित करण्यात आली. योजनेअंतर्गत निधी वितरणासाठी आवश्यक असलेले एकल नोडल एजन्सी खाते तयार करण्यात राज्य सरकारला अडचणी येत असल्याचे त्यांनी मान्य केले.

या पार्श्वभूमीवर एसएनए खाते नसतानाही लाभार्थ्यांना वाटप करता येईल असा ३ हजार कोटी रुपयांचा निधी देण्याची मागणी केंद्राकडे करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केंद्र प्रायोजित योजनांतील निधी वितरण अधिक पारदर्शक करण्यासाठी २०२१ मध्ये एसएनए प्रणाली लागू करण्यात आली असून, या अंतर्गत पीएफएमएस-आवास प्रणालीद्वारे थेट लाभार्थ्यांच्या खात्यात निधी वर्ग केला जातो.

केंद्र सरकारने २०२४-२५ आणि २०२५-२६ या आर्थिक वर्षांसाठी बिहारमध्ये १२.१९ लाखांहून अधिक घरांचे लक्ष्य निश्चित केले आहे. यापैकी आतापर्यंत २.९६ लाख घरे पूर्ण झाली असून ९.२३ लाख घरे अद्याप बांधकामाधीन आहेत. या योजनेत ७२ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना अद्याप पहिला हप्ता मिळालेला नाही. तर ११.३६ लाख लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाला असला तरी त्यापैकी फक्त ७.४७ लाख लाभार्थ्यांनाच दुसरा हप्ता मिळाल्याची माहिती सभागृहात देण्यात आली.

घरांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी लाभार्थ्यांना तातडीने निधीची आवश्यकता असल्याचे मंत्री शर्वण कुमार यांनी नमूद केले. केंद्राने नोडल खाते उघडण्याचे निर्देश दिले असतानाही राज्य सरकारकडून त्याची अंमलबजावणी झाली नसल्यामुळे निधी अडकल्याचे त्यांनी मान्य केले.

## सरला माहेश्वरी यांचे निधन

**नवी दिल्ली :** १९८० आणि १९९० च्या दशकातील टीव्ही बातम्यांमधील सर्वात प्रसिद्ध चेहऱ्यांपैकी एक असलेल्या दूरदर्शनच्या माजी वृत्तवाचक सरला माहेश्वरी यांचे गुरुवारी दिल्लीत निधन झाले, असे त्यांच्या कुटुंबातील मित्र शम्मी नारंग यांनी सांगितले. त्या ७१ वर्षांच्या होत्या. १९७६ ते २००५ पर्यंत दूरदर्शनवर वृत्तवाचक म्हणून काम करणाऱ्या माहेश्वरी, भारतातील टीव्ही बातम्यांच्या प्रवर्तकांपैकी एक होत्या, ज्या काळात दिवसभर काही तासांचे प्रसारण मर्यादित होते.

## मुर्शिदाबाद प्रकरणी अहवाल सादर करण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यात वारंवार घडणाऱ्या हिंसाचार आणि अशांततेच्या घटनांशी संबंधित प्रकरणात दहशतवादी कृत्यांशी संबंधित गैरकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदी लागू करण्याबाबतचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय तपास संस्थेला कोलकाता उच्च न्यायालयात सीलबंद लिफाफ्यात सादर करण्याचे निर्देश दिले.

पश्चिम बंगाल सरकारच्या अपीलावर निर्णय देताना सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला या प्रकरणातील राष्ट्रीय तपास संस्थेच्या चौकशीविरोधातील आक्षेपांसह कोलकाता उच्च न्यायालयात दाद मागण्यास सांगितले. केंद्र सरकारने या प्रकरणात राष्ट्रीय तपास संस्थेमार्फत चौकशी करण्याचा घेतलेला निर्णय योग्य आहे की नाही, याची तपासणी करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला असल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. या आधी, २० जानेवारी रोजी कोलकाता उच्च न्यायालयाने मुर्शिदाबाद जिल्ह्यात वारंवार होणाऱ्या हिंसाचार आणि अस्थिरतेबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली होती. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस आणि प्रशासनाने कठोर उपाययोजना कराव्यात, असे निर्देशही न्यायालयाने दिले होते.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पीएमओचे स्थलांतर

# 'सेवा तीर्थ' या नव्या कार्यालय संकुलाचे आज उद्घाटन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आज शुक्रवार, १३ फेब्रुवारी रोजी सेंट्रल व्हिस्टा पुनर्विकास प्रकल्पांतर्गत उभारण्यात आलेल्या त्यांच्या नव्या कार्यालय संकुलाचे उद्घाटन करणार आहेत. 'सेवा तीर्थ' असे नाव देण्यात आलेल्या या संकुलाचे उद्घाटन दुपारी दीड वाजता होणार आहे. पूर्वी 'एक्झिक्युटिव्ह एन्क्लेव्ह' म्हणून ओळखले जाणारे हे क्षेत्र आता नव्या नावाने देशाच्या प्रशासकीय कामकाजाचे केंद्र म्हणून कार्यरत होणार आहे.




पंतप्रधान कार्यालयासोबतच या संकुलात राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय यांचाही समावेश असेल. अधिकृत निवेदनानुसार, हे उद्घाटन भारताच्या प्रशासकीय व्यवस्थेतील एक महत्त्वाचा आणि परिवर्तनकारी टप्पा असून आधुनिक, कार्यक्षम आणि नागरिककेंद्रित प्रशासन घडवण्याच्या पंतप्रधानांच्या संकल्पनेचे प्रतीक आहे.

गेल्या अनेक दशकांपासून सेंट्रल व्हिस्टा परिसरात विविध ठिकाणी विखुरलेल्या आणि कालबाह्य पायाभूत सुविधांमधून महत्त्वाची सरकारी कार्यालये आणि मंत्रालये कार्यरत होती. या विखुरलेल्या रचनेमुळे कामकाजातील अकार्यक्षमता, समन्वयाचा अभाव आणि देखभाल खर्च वाढत होता. नव्या इमारतींमुळे प्रशासकीय कामकाज एकाच ठिकाणी, आधुनिक आणि भविष्यासाठी सज्ज सुविधांमध्ये एकत्र येणार असून या अडचणींवर तोडगा काढला जाणार आहे.

पंतप्रधान आज 'सेवा तीर्थ'बरोबरच 'कर्तव्य भवन एक' आणि 'कर्तव्य भवन दोन' यांचेही उद्घाटन करणार आहेत. या इमारतींमध्ये अर्थ, संरक्षण, आरोग्य व कुटुंब कल्याण, शिक्षण, कॉर्पोरेट व्यवहार, संस्कृती, कायदा व न्याय, माहिती व प्रसारण तसेच कृषी व शेतकरी कल्याण अशी अनेक प्रमुख मंत्रालये स्थलांतरित होणार आहेत.

या बदलाची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डिसेंबर २०२५ मध्ये केली होती. मोदी सरकारसाठी गेली अकरा वर्षे ही सत्तेची नव्हे, तर सेवेची वाटचाल असल्याचे त्यांनी नमूद केले होते. पंतप्रधानांच्या सेवाभावनेचा पुनरुच्चार म्हणून पंतप्रधान कार्यालयाला 'सेवा तीर्थ' असे नाव देण्यात आल्याचे शहा यांनी सांगितले होते. याच धर्तीवर भविष्यात राजभवन आणि राजनिवास यांची नावेही अनुक्रमे 'लोकभवन' आणि 'लोक निवास' अशी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.